वर्ष-०८ | अंक-०१ | मुंबई, मंगळवार २३ ते २९ नोव्हेंबर २०२१ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

•संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 मुंबई व लगतच्या शहरांमध्ये अवकाळी पावसामुळे संसर्गजन्य आजारात होणार वाढ

3 → मिरा भाईंदर महानगरपालिकेने सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज अंतर्गत देशस्तरावर रोवला झेंडा...!

सोशल मीडियावर फ्रेंडशीप, मोबाईल नंबर मागितला, मग थेट न्यूड कॉल, सेवानिवृत्त मुख्याध्यापकाला ब्लॅकमेलिंगचा प्रयत्न ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## दोन्ही लाटेत सात गावांमध्ये शून्य करोना रुग्ण



ठाणे: करोना नियमांचे काटेकोरपणे पालन आणि करोनाविषयक जागरूकता यामुळे करोनाच्या दोन्ही लाटेत ठाणे ग्रामीण भागातील सात ग्रामपंचायतीत अद्यापपर्यंत एकही करोना रुग्ण आढळून आलेला नाही. मुरबाड तालुक्यातील काही गावांचा यामध्ये समावेश आहे, अशी माहिती ठाणे जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार यांनी दिली. करोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत शहरी व ग्रामीण भागातही करोना रुग्णांचे प्रमाण अधिक होते. करोनाचा प्रादुर्भाव कमी व्हावा यासाठी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भाऊसाहेब दांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागात प्रभावशाली ...पान २ वर...

## केवळ हिंदूंवर गुन्हे दाखल होत असल्याचा भाजपाचा आरोप, संजय राऊत म्हणतात दंगलखोर



शिवसेना खासदार संजय राऊत यांनी अमरावतीत झालेल्या दंगलीवर बोलताना भाजपावर सडकून टीका केली. तसेच भाजपाच्या आरोपांवरही प्रत्युत्तर दिलं. भाजपाने राज्य सरकार केवळ हिंदूंवर गुन्हे दाखल करत असल्याचा आरोप केला. यावर त्यांनी दंगलीत सहभागी भाजपाच्या काही लोकांवर गुन्हे दाखल होणं म्हणजे हिंदूंवर गुन्हे दाखल झाले असं नसल्याचं मत व्यक्त केलं. तसेच जे दंगलखोर आहेत, ज्यांनी अमरावती पेटवली त्यांच्यावर कारवाई होईल, असंही नमूद केलं. ते मुंबईत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलत होते. संजय राऊत म्हणाले, "भाजपाच्या काही लोकांवर गुन्हे दाखल होणं म्हणजे हिंदूंवर गुन्हे दाखल झाले असं नाही. तसा आरोप करणं चुकीचं आहे. जे दंगलखोर आहेत. ज्यांनी अमरावती पेटवली, ज्यांनी अमरावतीच्या जनतेचं आणि सार्वजनिक मालमत्तेचं नुकसान केलं ते कुणीही असू द्या कायदा त्यांच्यावर कारवाई करेन. एका पक्षाचे आहेत म्हणून ते हिंदू किंवा मुस्लीम आहेत हे चालणार नाही."

**" दंगलीत सहभागी लोक एका गटाचे नसतात, ते दंगलखोर असतात "**

"एखाद्या पक्षाचे लोक दंगलीत सहभागी आहेत तर ते एका गटाचे नसतात ते दंगलखोर असतात. रझा अकादमीवर बंदीचा विचार केला जात आहे. सरकार, गृहमंत्री त्यावर निर्णय घेतील. भाजपाने आपली आक्रमकता दंगली भडकावून आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी दाखवू नये, तर तेथे शांतता निर्माण करण्यासाठी दाखवावी. कोणी कोणत्याही पक्षाचा का असेना असं करणं योग्य नाही. महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्था व्यवस्थित राहिली पाहिजे," असं संजय राऊत यांनी सांगितलं.

**"भाजपा आक्रमक आहे म्हणजे त्यांना परत दंगल करायची आहे का?"**

भाजपाच्या आक्रमक भूमिकेवर हल्ला चढवताना संजय राऊत म्हणाले, "भाजप अजूनही आक्रमक आहे म्हणजे त्यांना परत दंगल करायची आहे का? ते कशासाठी आंदोलन करत आहेत. जे काय व्हायचं ते कायद्यानं होईल ना. ते महागाई विरोधात आंदोलन करत आहेत का? की तिकडे चीन लडाखमध्ये घुसला म्हणून आंदोलन करत आहेत? भाजपानं सांगावं कशासाठी आंदोलन करत आहेत."

"हिंमत असेल तर रझा अकादमीवर बंदी घाला", भाजपाच्या आव्हानावर संजय राऊत म्हणाले, "भाजपाने रझा अकादमीवर बंदी का घातली नाही? फडणवीस सरकारच्या काळातही काही प्रकार घडले होते. या राज्याचं ...पान २ वर...

## भाजपच्या 'ऑपरेशन लोटस'ला शिवसेनेचं 'ऑपरेशन धनुष्यबाण'ने उत्तर, एकनाथ शिंदेंची मोठी कामगिरी

ठाणे, कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात राजकीय घडामोडींनी वेग आला आहे. विशेष म्हणजे भाजपचं 'ऑपरेशन लोटस ही संकल्पना सर्वश्रुत आहे. केडीएमसीत भाजपची सत्ता स्थापण करण्यासाठी सर्वोतोपरी तयारी सुरु आहे. पण भाजपला धक्का देणारी बातमी आता समोर आली आहे. भाजपच्या 'मिशन लोटस'ला आता शिवसेनेकडून 'ऑपरेशन धनुष्यबाण'ने उत्तर देण्यात येतंय. कारण भाजपचे पाच नगरसेवक शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. त्यांच्या पक्षप्रवेशाचा कार्यक्रम आज संध्याकाळी पार पडणार आहे. शिवसेनेचे नेते आणि राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम होणार आहे. भाजपच्या रविंद्र चव्हाणांच्या नगरसेवकांना शुभेच्छा कल्याण डोंबिवली महापालिकेची मुदत संपली आहे. कोरोना संकटामुळे केडीएमसी निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे शहरात सध्या प्रशासकीय राजवट सुरु आहे. कोरोना रुग्णांची संख्या आता ओसरल्याने महापालिकेच्या निवडणुकीची घोषणा कधीही जाहीर होऊ शकते. त्यामुळे आगामी महापालिका



निवडणुकीत आपली सत्ता स्थापन व्हावी यासाठी भाजपकडून सर्वोतोपरी प्रयत्न सुरु आहे. भाजपचे एकीकडे प्रयत्न सुरु असताना शिवसेनेच्या एकनाथ शिंदेकडूनही तोडीस तोड प्रयत्न सुरु असल्याचं दिसत आहे. त्यातूनच भाजपचे पाच नगरसेवक आता शिवसेनेत प्रवेश करत आहेत. विशेष म्हणजे या पाच नगरसेवकांना भाजपचे आमदार रविंद्र चव्हाण यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. खरंतर कल्याण-डोंबिवलीला शिवसेनेचा बालेकिल्ला म्हटला जातो. कल्याणचे अनेक लोकप्रतिनिधी हे शिवसेनेचेच आहेत. पण गेल्या निवडणुकीत भाजपने मोठी मुसंडी मारली होती. त्यावेळी राज्यात युतीचं सरकार होतं. तरीही शिवसेना आणि भाजप यांनी वेगवेगळी निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत ...पान २ वर...

## पाच करोड पेक्षा जास्त किमतीचा मोठा अंमली साठा पकडण्यात वडाळा पोलिसांना मिळाले यश



वडाळा : दिनांक २०/११/२०२१ रोजी गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-०४, अँटॉपहील मुंबई पोलीस ठाणे, वडाळा यांना गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली कि २१/११/२०२१ रोजी चेंबूर शिवडी रोड, वडाळा, याठिकाणी एक ३५ ते ४०वर्षे वयोगटातील नायजेरीयन नागरीक मेफेड्रॉन (एम.डी.) या अंमली पदार्थाची विक्री करण्याकरीता येणार आहे. त्यावरून पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पथक तयार करण्यात येवून सदर परिसरात सापळा रचण्यात आला होता. मिळालेल्या माहितीच्या आधारे एक इसम प्रसंशयितरित्या उभा असल्याचा व कोणाची तरी वाट पाहत असल्याचे पोलिसांना दिसुन आले.त्यावेळी त्याच्या हातामध्ये एक निळया रंगाची मोठी प्लॅस्टीक पिशवी होती. त्याच्या हालचाली संशयीत वाटल्याने हि व्यक्ती तीच असल्याची खात्री झाल्याने नमुद पोलीस पथकाने घेराव घालुन त्यास पळुन जाण्याची संधी न देता झडप टाकुन ताब्यात घेतले त्यानंतर जागीच कायदेशीर बाबींची पुर्तता करून त्याची झडती घेतली असता प्लॅस्टीक बॅगेमध्ये एकूण पाच वेगवेगळया रंगाच्या लेडीज मोठया नवीन पर्स मिळून आल्या. सदर सर्व पर्सची पाहाणी केली असता पर्सच्या आतील दोन्ही बाजूस असलेल्या कापडी अस्तरच्या आत मध्ये संशयीत वस्तू असल्याचे आढळून आले. म्हणून सदर पर्सचे अस्तर फाडून पाहाणी केली असता त्यामध्ये एकूण ४ किलो ९६५ ग्रॅम मेफेड्रॉन (एम.डी.)अंदाजे किंमत ४ करोड,९६ ...पान २ वर...

## चेंबूर पोलिसांची दमदार कामगिरी - खून करून फरार झालेल्या आरोपीस अटक

चेंबूर : दि.२०/११/२०२१ रोजी मानखुर्द रेल्वे स्टेशन वर दोन अज्ञात इसमांचे लोकल मधून उतरताना वाद निर्माण झाला त्यावरून आरोपी याने कोणत्यातरी धारधार हत्याराने पोटामध्ये वार करुन दिपक चंद्रकांत हिरे वय २९ वर्षे यास जबर जखमी करुन त्याचा खुन केला म्हणुन वाशी रेल्वे पोलीस ठाणे मुंबई येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता . सदर खुनाच्या गुन्हयातील अनोळखी आरोपीबाबत काहीएक माहीती उपलब्ध नव्हती तसेच रेल्वे



पोलीस ठाणे यांचेकडील सीसीटीव्ही फुटेज वरुन अस्पष्ट असल्याने काहीएक माहीती प्राप्त होत नव्हती.सीसीटीव्ही फुटेज चे बारकाईने निरीक्षण करून , "सदरच्या खुनाच्या गुन्हयातील आरोपी हा खारघर नवी मुंबई परीसरातील असुन त्याच्यावर अजून ०५ गुन्ह्यांची नोंद होती त्यावरून हा गुन्हेगार सराईत आहे याची खबर प्रभारी पोलीसनिरीक्षक साळुखे यांना अवगत करुन त्यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस कक्षाचे पथक तयार ...पान २ वर...

## राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन लांबणीवर, अधिवेशन नागपूरऐवजी मुंबईत घेण्याची तयारी



मुंबई, राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशनासंदर्भात मोठी अपडेट समोर आली आहे. राज्य विधीमंडळाचे अधिवेशन लांबणीवर गेलं असल्याची माहिती समोर येतेय. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या तब्येतीमुळे ...पान २ वर...

## सौशल मीडिया चा गैर वापर करुन आर्थिक फसवणुक करणाऱ्या आरोपीस पकडण्यात सायबर गुन्हे शाखेस यश

भाईंदर : ऑनलाईन जाहिराती मार्फत लोकांना फसवणाऱ्या व्यक्ती विरुद्ध नवघर पोलीस ठाण्यात एक तक्रार दाखल करण्यात आली होती त्यानुसार तक्रारदार यांना Instagram ID mentor mayur या इन्स्टाग्राम आयडीवरुन



Investment 2k returns 10 k, Returns will be given in just 10 mins, if any one interested then msg me " Ready to invest 2k" Offer valid till midnight अशी जाहीरात प्रसारित करुन त्यांच्याकडून ...पान २ वर...

## कल्याण : अनेकदा समज देऊनही शेजारी राहणारा रिक्षावाला वहिनीच्या बेडरुममध्ये डोकवायचा; दिराने केला खून



कल्याणमध्ये वारंवार खिडकीतून लोकांच्या बेडरूममध्ये डोकावणे एका रिक्षा चालकाला महागात पडले आहे. कल्याणमधील उंबर्डे गावात झालेल्या हत्या प्रकरणी खडकपाडा पोलिसांनी सोपान पंजे नावाच्या युवकाला अटक केली आहे. त्याने रिक्षा ...पान २ वर...

## राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे अधिकारी बनून खंडणी वसुली करणाऱ्या आरोपीना केले जेरबंद







भाईंदर : नॅशनल ह्युमन राईटचे शासकीय अधिकारी आहेत हे सांगून रेशनिंगचे दुकान चालवणाऱ्या कडून खंडणीची मागणी करणाऱ्यांना नवघर पोलिसांनी ताब्यात घेतले. सूत्रांच्या माहितीनुसार रमेश सुर्यप्रसाद वर्मा, वय ३२ वर्षे यांचे किराणा व रेशनिंगचे दुकान असून त्यावर त्यांच्या परिवाराचा उदरनिर्वाह करतात. दिनांक ०५.११.२०२१ रोजी वर्मा यांच्या दुकानावर एक अनोळखी महिला व पुरुष यांनी येऊन त्यांना ते नॅशनल ह्युमन राईटचे शासकीय अधिकारीशबानाबानो बल्लुभाई सिध्दीकी व प्रशांत गंगा विष्णूआहोत असे बोलुन त्यांच्याकडून तुम्ही रेशनचे वाटप कसे करता व तुमचे कम्प्लेंट बुक दाखवा अशी मागणी केली असता दुकानदार याने ती वही नेहमी ...पान २ वर...

## विधीसंघर्षित मुलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वयंसेवी संस्था पुढे सरसावली




पुणे- शहरातील बालगुन्हेगारीचे प्रमाण रोखण्यासाठी तसेच अल्पवयीन मुलांवर बसलेला गुन्हागारीचा शिक्का पुसून टाकण्यासाठी 'होप फार द चिल्ड्रेन फाऊंडेशन' ही स्वयंसेवी संस्था पुढे सरसावली आहे. विधीसंर्घषित, पीडित मुलांचे समुपदेशन करण्यासाठी, तसेच त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शहरात बालस्नेही पोलीस कक्षाची उभारणी करण्यात आली आहे. या कक्षाद्वारे विधीसंर्घषित बालकांसाठी कायम समुपदेशनाचे आयोज केले जाते. संवाद घडवून आणण्यासाठी प्रयत्न समाजामध्ये या मुलांबाबत विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला ...पान २ वर...

# पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार २३ ते २९ नोव्हेंबर २०२१


# अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाने दातार कॅन्सर जेनेटिक्सद्वारे भारतात विकसित केलेल्या अर्ली-स्टेज ब्रेस्ट कॅन्सर डिटेक्शन ब्लड टेस्टला ब्रेकथ्रू मानांकन

४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या स्त्रियांमध्ये सुरुवातीच्या टप्प्यातील स्तनाचा कर्करोग शोधण्यात सक्षम असलेली ही पहिली रक्त चाचणी

मुंबई- दातार कॅन्सर जेनेटिक्स या कॅन्सर संशोधन कंपनीने जाहीर केले की, अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाने सुरुवातीच्या टप्प्यातील स्तनाचा कर्करोग शोधण्यासाठी रक्त तपासणीसाठी 'ब्रेकथ्रू पदनाम' म्हणजे एखाद्याचे जीवन वाचवणारी टेस्ट असे मानांकन दिले आहे. .ही रक्त तपासणी कंपनीने विकसित केलेल्या वैद्यकीय तंत्रज्ञानाचा वापर करून स्तनाच्या कर्करोगाशी संबंधित ट्यूमर पेशी आणि क्लस्टर्स अतिशय अचूकतेने ओळखतात. क्लिनिकल ट्रायल्सच्या डेटावरून असे दिसून आले आहे की चाचणी स्टेज 0 (DCIS) आणि स्टेज १ स्तन कर्करोग ९९ % पेक्षा जास्त अचूकतेसह शोधू शकता. निरोगी आणि कर्करोगाच्या रूग्णांचा समावेश असलेल्या २० हजारहून अधिक महिलांवर चाचणी प्रमाणित करण्यात आली आहे.



चाचणीसाठी फक्त ५ मिली रक्त आवश्यक आहे आणि या प्रक्रियेत मॅमोग्राफीशी संबंधित अथवा कोणत्याही रेडिएशनसंबंधित उपचार केले जात नाही. भारतात १.७ लाखांहून अधिक महिलांना स्तनाचा कर्करोग आढळून आला आहे, बहुतांशी महिलांमध्ये हा कर्करोग तिसऱ्या अथवा चौथ्या स्टेजला कळतो व अशा वेळी त्या महिलेवर उपचार करणे कठीण होऊन जाते., हे उपचार महागडे असतात त्यामुळे स्तनाच्या कर्करोगाचे निदान लवकर झाल्यास जवळजवळ ९९ टक्के स्तनाचा कर्करोग बरा होऊ शकतो.

याविषयी अधिक माहिती देताना कंपनीचे अध्यक्ष श्री. राजन दातार म्हणाले. " ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या स्त्रिया त्यांच्या घरी किंवा कार्यालयातील सोयी आणि गोपनीयतेतून त्यांच्या डॉक्टरांशी सल्लामसलत करून स्तन कर्करोगाची विशिष्ट रक्त चाचणी घेऊ शकतात. यूएस एफडीएने आमच्या चाचणीला एक महत्त्वाचा टप्पा असलेले तंत्रज्ञान म्हणून मान्यता दिल्याने आम्हाला आनंद झाला आहे. हे चाचणीच्या संभाव्यता अधोरेखित करते ज्याचा आम्हाला विश्वास आहे की जगभरात या भयानक रोगाचा लवकर शोध आणि बरा करण्यात क्रांती होईल. शिवाय, भारतातील आपल्या शास्त्रज्ञांनी आणि वैद्यकीय तज्ज्ञांनी देशाला जागतिक कर्करोग संशोधनाच्या केंद्रस्थानी ठेवले आहे आणि हे पंतप्रधानांच्या 'आत्मनिर्भर भारत' अभियानाचे उदाहरण आहे.चाचणी युरोपमध्ये आधीच उपलब्ध आहे आणि CE चिन्हांकित आहे. ही चाचणी लवकरच भारतात इझी चेक म्हणून उपलब्ध होईल आणि वाजवी किंमत असेल. आमची कंपनी अनेक आघाडीच्या आरोग्य सेवा प्रदात्यांशी चर्चा करत आहे.कंपनीने फुफ्फुस, स्वादुपिंड आणि अंडाशय यांसारख्या अत्यंत घातक घातक रोगांसह अनेक कर्करोग शोधण्यासाठी रक्त तपासणी देखील प्रमाणित केली आहे आणि पुढील वर्षी उपलब्ध होईल. दातार कॅन्सर जेनेटिक्स हे कॅन्सरचे उत्तम निदान, उपचार निर्णय आणि व्यवस्थापनासाठी नॉन-इनवेसिव्ह तंत्रांमध्ये विशेषज्ञ असलेले कर्करोग संशोधन महामंडळ आहे. कंपनीचे अत्याधुनिक कर्करोग संशोधन केंद्र अनेक संस्थांच्या मानांकनाला सामोरे गेले असून कंपनी इंग्लड , युरोपियन देश , अमेरिका व भारतातीळ कर्करोग रुग्णांना सेवा देत आहे.

# मुंबई व लगतच्या शहरांमध्ये अवकाळी पावसामुळे संसर्गजन्य आजारात होणार वाढ

## हृदयविकार असलेल्या नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे डॉक्टरांचे आवाहन



मुंबई/ठाणे - पावसाळा हा सर्वांचाच आवडीचा सीजन असला तरी अवकाळी पाऊस हा सर्वसामान्य नागरिकांना त्रास देणारा ठरत आहे. अवकाळी पावसामुळे तापमानात घट होत असल्याने सर्दी, खोकला, व्हायरल-ताप न्यूमोनिया व अस्थमा यासारखे श्वसनाचे आजार पसरण्याची शक्यता आहे. या अवकाळी पावसामुळे पिण्याच्या पाण्यामध्ये गढूळपणा येतो व त्यामुळे कावीळ, डायरियासारखे रोग पसरण्याची शक्यता असते. याविषयी अधिक माहिती देताना कल्याण येथील सिद्धिविनायक मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ.अभय गायकवाड म्हणाले ," अवकाळी पावसामुळे तापमानात घट होते, सततच्या ढगाळ वातावरणामुळे वायू प्रदूषण हे खाली राहते व यामुळे अनेकांना श्वसनाचे आजार जडतात.

अस्थमा रुग्णांसाठी हा सर्वात कठीण काळ आहे कारण पहाटे धुके पडत असल्याने कारखाने, गाड्या तसेच हॉटेल्स मधून निघणारा धूर हा जामिनापासून २०० फुटापर्यंत राहतो व हाच धूर धुके गेल्यानंतर वातावरणात मिसळतो, दुपारी नंतर ढगाळ वातावरण असल्यामुळे नव्याने निर्माण होणारा धूर तिथेच फिरत राहतो व याचा त्रास श्वसनयंत्रणांवर होतो. मॉर्नींग वॉकला जाणाऱ्या नागरिकांमध्ये श्वसन विकार वाढतात परंतु अनेक नागरिक याला वातावरण बदलाचा त्रास म्हणून दुर्लक्ष करतात व पुढे जाऊन श्वसन विकार वाढतात, अनेकांना याकाळात ऍलर्जीचा त्रास होतो, म्हणजेच श्वसनमार्गे प्रदूषित हवेतील दूषित स्पर्टिकल शरीरात जाऊन ते ऍलर्जीचे कारण ठरते. हिवाळा अजून सुरु झालेला नाही परंतु आधीच्या कडक ऊन तर कधी अवकाळी पाऊस मुंबई तसेच लगतच्या शहरातील नागरिकांचे आरोग्य बिघडवत आहे." आपले घर आणि परिसर स्वच्छ ठेवा, हात व्यवस्थित धुवा, तोंडाला, नाकाला वारंवार हात लावू नका, खोकताना आणि शिंकताना तोंड आणि नाकापुढे रूमाल किंवा हात धरा, अशा सूचना डॉ.अभय गायकवाड यांनी दिल्या आहेत. हृदयविकार व अवकाळी पाऊस याविषयी सांगताना नेरुळ येथील शुश्रूषा हार्ट केयर व स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक व हृदय शल्यविशारद डॉ. संजय तारळेकर म्हणाले राज्यात आधीच कोविडने लोकांची घाबरगुंडी उडविली आहे. त्यात अवकाळी पावसामुळे सर्दी, खोकला, ताप आणि घशात खवखवण्याचे प्रकार वाढले आहे. ही सर्व कोविडचीही लक्षणे असल्यामुळे मानसिक दडपण वाढत आहे. दमा, अस्थमा, किडनीचे विकार, लिव्हर, हृदयविकार, फुप्फुसांचे आजार असणाऱ्या पेशंटनि जास्त काळजी घेणे गरजेचे आहे. ज्या नागरिकांना हृदयविकार असतात अथवा हृदयविकारावर शस्त्रक्रिया झालेल्या असतात त्यांना शुद्ध हवेची गरज असते , अशा दूषित वातावरणात गेल्यामुळे अशा रुग्णांना धाप लागणे, श्वास घेण्यास त्रास होणे, उच्च रक्तदाब असा त्रास होण्याची शक्यता असते म्हूच अशा नागरिकांनी सध्या मॉर्निंग वॉक टाळावे, तसेच डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आहार घेणे गरजेचे आहे कारण अशा कालावधीत पचनशक्ती कमी होते. घसादुखी, ताप, अंगदुखी, डोके दुखणे, उलटी ही लक्षणे आढळल्यास तातडीने डॉक्टरांकडे जाणे. हृदयविकार असणाऱ्या रुग्णांनी कोलेस्ट्रॉल, रक्तदाब आणि मधुमेह आटोक्यात ठेवण्याकरता औषधे घेत राहणे व तपासण्या करणे तितकेच गरजेचे आहे.

## विधीसंघर्षित मुलांना समाजाच्या

जातो. मुले व त्यांच्या पालकांमध्ये संवाद घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. कोरोनाच्या महामारीमुळे मागील दीडवर्षात या उपक्रमाला स्थगिती मिळाली होती. मात्र आता कोरोनाची स्थितीबरीच आटोक्यात असल्याने पुन्हा या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली आहे, अशी माहिती सहायक पोलीस निरीक्षक अर्चना कटके यांनी दिली आहे. या गोष्टींचे दिले जाते प्रशिक्षण या उपक्रमाद्वारे मुलाची आवड लक्षात घेऊन त्याना ट्रेनिंग दिले जाते. यामध्ये मोबाईल दुरुस्ती, जीम टेनर असे काही कोर्सेस त्यांना संस्थेमार्फत शिकविले जातात.तसेच त्यांना नोकरी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातात. एखाद्याला शिक्षण घ्यायचे असेल तर त्याला शिक्षणासाठीही मदत केली जाते .याबरोबरच वेळोवेळी बालमानसोपचारतज्ञाचे मार्गदर्शनही घेतले जाते.

## सोशल मीडिया चा गैर वापर करून

७०००/- रुपयांची रक्कम स्विकारून फसवणुक केली याबाबत सायबर गुन्हे शाखा येथे दिनांक २२/१०/२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता . सायबर गुन्हे शाखेने तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीबाबत तात्काळ चौकशी करून तांत्रीक माहीतीच्या आधारे दिनांक १९/११/२०२१ रोजी संशयित १) मयुर अनिल पटवा, वय २६ वर्षे रा. खेतवाडी मुंबई यास ताब्यात घेवुन त्याची कसून चौकशी केली असता त्यांनी सदर प्रकार केल्याचे उघडकीस आले तसेच त्याचा मोबाईल पोलिसांनी चेक केला त्यामध्ये Instagram ID mentor mayur याहे इन्स्टाग्राम अकाउंट लॉग ईन मिळून आले आहे. तसेच आरोपी कडे केलेल्या तपासामध्ये त्याने खालील मोबाईल क्रमांक/खाते क्रमांक/युपीआय आयडी/इन्स्टाग्राम आयडी/ईमेल आयडी गुन्हा करण्यासाठी वापरले असल्याची माहिती दिली आहे. इन्स्टाग्राम आयडी Instagram ID"mentor_mayur" प्रोफाईल मध्ये (mentor mayur - BusinessMan, Studies in Stanford University, EARN MONEY, DM ME, ) असा संदेश लिहून ठेवला आहे.

युपीआय आयडी Bharatpe 09895405649@yesbankltd,

बँक खाते क्रमांक बँक ऑफ इंडीया खाते क्रमांक 003910110001335 मोबाईल क्रमांक 9895405649 7666375770 ईमेल आयडी mayurpatwa77@gmail.com

वरील इन्स्टाग्राम आयडी "mentor_mayur"वरुन लोकांना Investment 2k returns 10 k, Returns will be given in just 10 mins if any one interested then msg me " Ready to invest 2k" Offer valid till midnight असे जाहीरातीद्वारे आमिष दाखवुन त्यांना वरील युपीआय आयडीवर पैसे पाठविण्यास सांगुन सदरची रक्कम स्विकारून फसवणूक करीत होता.सदर संशयित आरोपीस पुढील कायदेशीर कारवाई करीता नवघर पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले असुन त्याचे विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सायबर गुन्हे शाखा, मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालय यांच्याकडून जनतेला आवाहन करण्यात आले कि, Instagram ID"mentor mayur"तसेच वरील युपीआय आयडी, मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी व बँक खात्यांशी संबधित व्यवहार करून गुंतवणुक करुन आर्थिक फसवणुक झालेली असल्यास नजीकच्या पोलीस ठाणेस अथवा सायबर गुन्हे शाखा, मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा. सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, पोउपनिरी संतोष भिसे, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोशि/गणेश इलग, पोशि/प्रविण आव्हाड, मपोशि/ पल्लवी निकम, मपोशि/सुवर्णा माळी, मपोशि/माधुरी धिंडे यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे. सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- 022-2811 0135 सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- 900 488 0135 सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी

:-cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in

## राज्य विधिमंडळाचे हिवाळी

डिसेंबर पासून सुरू होणारे राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात घेण्याची राज्य सरकार तयारी करत असल्याचं समजतंय. त्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्यमंत्री अनिल परब, शिवसेना विधिमंडळ गट नेते एकनाथ शिंदे, शिवसेना नेते सुभाष देसाई, राष्ट्रवादी काँग्रेसचे गट नेते जयंत पाटील, काँग्रेसचे गट नेते बाळासाहेब थोरात येत्या दोन ते तीन दिवसांत विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे. या भेटीदरम्यान हिवाळी अधिवेशन डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात घेण्यासंदर्भात चर्चा करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.हिवाळी अधिवेशन 7 डिसेंबर 2021 रोजी नागपूर येथे होईल असं जाहीर करण्यात आलं होतं. नियोजित अधिवेशनाला 15 दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. अधिवेशनाच्या महिनाभर आधी कामकाज सल्लागार समितीची बैठक होते. मात्र अद्याप अधिवेशनाच्या तयारीची काहीही हालचाल दिसून येत नाही आहे. त्यातच शस्त्रक्रिया झाल्यानंतर मुख्यमंत्री ठाकरेंना देखील अजूनही डिस्चार्ज मिळालेला नाही आहे. प्रथा आणि परंपेरनुसार हिवाळी अधिवेशन नागपूरला होत असतं. मात्र मुख्यमंत्र्यांची तब्येत लक्षात घेता अधिवेशन मुंबईत होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यासंदर्भातला निर्णय लवकरच या आठवड्यात सरकार आणि प्रशासन घेणार असल्याचं समजतंय. तर दुसरीकडे अधिवेशन नागपूरलाच व्हावं यासाठी भाजपचे नेते आग्रही आहेत. तर हिवाळी अधिवेशन मुंबईतच व्हावं यासाठी शिवसेना काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस आग्रही आहे. नियमाप्रमाणे हिवाळी अधिवेशन हे नागपूरला झाले पाहिजे ही परंपरा आहे, असं आमदार रवी राणा म्हणालेत. विदर्भातील जनता, शेतकरी, शेतमजूर हे या अधिवेशनाची वाट पाहत असतात आणि यामध्ये विदर्भाच्या विकासाचे प्रश्न मार्गी लागतात, असं त्यांनी म्हटलंय. तर मुख्यमंत्र्यांची तब्येत खराब असल्याने त्यांनी त्यांची तब्येतीची काळजी घ्यावी. त्यांचा ज्यांच्यावर विश्वास असेल अशा व्यक्तीला प्रभारी मुख्यमंत्री पद देऊन हे अधिवेशन घेण्यात यावे आणि विदर्भाच्या जनतेला न्याय द्यावा अशी मागणी युवा स्वाभिमान पक्षाचे आमदार रवी राणा यांनी केली आहे.

## कल्याण : अनेकदा समज

चालक अभिमान भंडारी याची धारदार शस्त्राने हत्या केली होती. अभिमान दररोज पहाटे सोपान याच्या वहिनीच्या बेडरुमच्या खिडकीतून डोकावून पाहता होता. त्याला वारंवार समजावले. यानंतर देखील तो ऐकत नसल्याने सोपान याने अभिमान याची हत्या केल्याची कबूली दिली आहे. कल्याण पश्चिमेत उंबर्डे गावात ३ दिवसांपूर्वी रिक्षा चालक अभिमान भंडारी याची पहाटेच्या सुमारास धारदार शस्त्रने हत्या करण्यात आली होती. अभिमान याच्या हत्येनंतर एकच खळबळ उडाली होती. खडकपाडा पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करीत तपास सुरू केला. डीसीपी सचिन गुंजाळ, एसीपी उमेश माने पाटील, वरिष्ठ पोलीस निरिक्षक अशोक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी २४ तासांच्या आत या प्रकरणाचा छडा लावला. रात्रीच्या वेळी लोकांच्या बेडरुमध्ये डोकावण्याची विकृती या प्रकरणात पोलिसांनी सखोल तपास करीत अभिमान याची हत्या करणाऱ्या तरुणाला ताब्यात घेतले. आरोपीच्या अटकेनंतर जी माहिती समोर आली ती अतिशय धक्कादायक आहे. अभिमानच्या विकृतीमुळेच त्याचा अंत झाल्याचे समोर आले आहे. अभिमानला रात्रीच्या वेळेत लोकांच्या बेडरुमध्ये डोकावून पाहण्याची वाईट सवय होती. एका रात्री अभिमान वहिनीच्या घरातील खिडकीतून त्यांच्या बेडरुममध्ये डोकावत असल्याचं आरोपी सोपान पंजे याने पाहिलं. यानंतरही दोन-तीन वेळा असा प्रकार घडला. सोपानचा भाऊ एका प्रकरणात जेलमध्ये आहे. वारंवार सांगूनही अभिमान ऐकण्यास तयार नव्हता. अखेर त्याने पुन्हा बेडरूममध्ये डोकावल्यानं सोपानने रागाच्या भरात अभिमानची धारदार शस्त्राने हत्या केली, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरिक्षक अशोक पवार यांनी दिली.

# पृष्ठ १ वरुन

## दोन्ही लाटेत सात गावांमध्ये शून्य करोना रुग्ण

उपाययोजना पहिल्या लाटेपासून राबविल्या जात आहेत. या उपाययोजनेस नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्यामुळे मागील काही दिवसांपासून ठाणे ग्रामीण भागात करोनाचा प्रादुर्भाव ओसरल्याचा दावा जिल्हा परिषदेने केला आहे. ठाणे जिल्ह्यातील ४३१ ग्रामपंचायतींपैकी मागील २८ दिवसात ४०४ ग्रामपंचायतीत एकही करोना रुग्ण आढळून आलेला नाही. चाचणी, उपचार, रुग्णांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींचा शोध, लसीकरण आणि जनजागृती या पंचसूत्रीवर विशेष भर दिला जात असल्यामुळे सद्यस्थितीला ग्रामीण भागात करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याचे चित्र आहे. मागील वर्षी मार्च महिन्यात सर्वत्र थैमान घातलेल्या करोना विषाणूचा शिडकाव ग्रामीण भागात होऊ नये यासाठी ग्रामपंचायत स्तरावर अनेक उपाययोजना आखण्यात आल्या होत्या. नियमांविषयी जनजागृती ठाणे ग्रामीण भागातील सात ग्रामपंचायती अशा आहेत की या गावांत करोनाच्या दोन्ही लाटेत एकही रुग्ण आढळून आला नसल्याची बाब समोर आली आहे. यामध्ये मुरबाड सात आणि शहापूर तालुक्यातील एका गावाचा समावेश आहे. करोनाचा प्रादुर्भाव या गावात होऊ नये यासाठी ग्रामपंचायत स्तरावर मोठ्या प्रमाणात करोना नियमांविषयी जनजागृती करण्यात येत होती.

## भाजपच्या 'ऑपरेशन लोटस'ला शिवसेनेचं

शिवसेनेला 52 जागांवर यश मिळालं होतं. तर भाजपला तब्बल 42 जागा मिळाल्या होत्या. शिवसेना आणि भाजपच्या तुलनने काँग्रेस आणि राष्ट्रवादीला फार कमी जागांवर समाधान मानावं लागलं होतं. त्यावेळी राष्ट्रवादीला 2, काँग्रेसला 4, एमआयएमला 1 तर अपक्षांना 10 जागांवर समाधान मानावं लागलं होतं. त्यानंतर आता आगामी माहापालिकेत नेमकं कोण बाजी मारतं ते पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे. आगामी निवडणुकीचे गणितं फार वेगळी कल्याण-डोंबिवली महापालिकेच आगामी निवडणूक ही फार वेगळी असणार आहे. त्यामागे गेल्या दोन वर्षात घडलेल्या राजकीय घडामोडी कारणीभूत ठरणार आहेत. राज्यात दोन वर्षांपूर्वी विधानसभेची निवडणूक पार पडली होती. या निवडणुकीच्या निकालानंतर शिवसेनेने भाजपचा हात सोडत राष्ट्रवादी-काँग्रेससोबत सत्ता स्थापन केली होती. या आघाडीमुळे कल्यामधीलही राजकीय गणिते बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या निवडणुकीत भाजप आणि मनसेची युती होणार असल्याचा अंदाज बांधला जातोय. तर महाविकास आघाडी एकत्र लढून भाजपचा पराभव करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याची शक्यता वर्तवली जातेय. पण निवडणुकीनंतर महाविकास आघाडीतील घटक पक्ष स्वतंत्र निवडणुकीचा निर्णय घेऊ शकतात. त्यामुळे केडीएमसीत महापालिकेच्या निवडणुकीचा चांगलाच धुराळा उडताना दिसणार आहे.

27 गावांच्या निकालावर प्रभार रचना अवलंबून

दरम्यान, केडीएमसीत 27 गावांच्या प्रश्नांवर अजूनही हवा तसा तोडगा निघालेला नाही. केडीएमसीच्या 122 प्रभागांमध्ये सध्या तरी 27 गावांचा समावेश आहे. पण याबाबत स्थानिक संघटनांनी उच्च न्यायालयात धाव घेतल्याने हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. पण न्यायालयाचा जपर्यंत निर्णय येणार नाही तोपर्यंत केडीएमसीची प्रभाग रचना ठरणार नाही, हे देखील एक वास्तव आहे.

## पाच करोड पेक्षा जास्त

लाख, ५० हजार व १९८ ग्रॅम कोकेन अंदाजीत किंमत३९ लाख,६० हजार असे एकूण ५ करोड, ३६ लाख, १० हजार रूपये एवढया किंमतीचे अंमली पदार्थ मिळून आले. सदरचे अंमली पदार्थ हे आरोपी याने दिल्ली वरून आणल्याचे सांगितले आहे. सदरबाबत वडाळा पोलिस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हा नोद करून आरोपीस नमूद गुन्हात अटक करण्यात आलेली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त(गुन्हे) श्री मिलिंद भारंबे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री एस विरेश प्रभु, मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण), श्री. प्रकाश जाधव, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त (डी-मध्य), श्री.नितीन अलकनुरे यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक इंद्रजित मोरे, पो.नि. भांबळ, सपोनि बिराजदार, सपोनि गव्हाणे मसपोनि पवार, पोउनि आंब्रे, पोहक्र/परब, पोहक्र/सुर्यवंशी, पोहक्र /निखाडे, पोनाक्र /कांबळे, पोनाक्र /पाटिल, पोशिक्र/घेरडे पोशिक्र. अनुपम जगताप, पोशिक/चौरे,पोशिक्र /रोटे यांनी पार पाडलेली आहे.

## राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे

रेशनिंग अधिकारी तपासणी करीत असल्याने तुम्हांस मी ओळखत नाही असे सांगून सदर वही देण्यास दुकानदार याने नकार दिला त्यावरून आम्ही सुध्दा शासकीय अधिकारी आहोत, कम्प्लेट बुक दाखविली नाही तर तुमच्याविरुध्द केस करु तसेच आम्ही इतर रेशनिंग दुकानावरील कम्प्लेट बुक तपासणी केली आहे त्यांनी आम्हाला फी दिल्याने आम्ही त्यांच्यावर केस केलेली नाही असे संगितले त्यानंतर सदरील अनोळखी इसमांनी दुकानदार यांना आपण कोणतीही केस करणार नाहीत त्याबदल्यात त्यांची फी म्हणुन ५०,०००/- रु. ची मागणी केली. त्यावेळी दुकानदार घाबरल्याने व त्यांच्या गल्ल्यात असलेले २०,०००/- रु. ती रक्कम सदरच्या अनोळखी इसमांना दिली. व उर्वरीत ३०,०००/- रु. रक्कम एका आठवड्याचे आत दे नाहीतर केस करु असे बोलुन ते निघुन गेले. झालेल्या प्रकाराबाबत दुकानदार यांनीपोलीस नवघर ठाण्यात तक्रारी अर्ज दिला होता. दि. १९.११.२०२१ रोजी नवघर पोलीस ठाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना आरोपी १) शबानाबानो बल्लुभाई सिध्दीकी, वय ३० वर्ष, सांताक्रुज पश्चिम, २) प्रशांत गंगा विष्णु, वय २७ वर्ष, रा. मिरा रोड, यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांना अटक करण्यात आली आहे . नमुद आरोपीकडुन ह्यूमन राईटचे नावाने असलेले ओळखपत्र प्राप्त केले असुन त्यावर National Human Rights & Social Justice Commission (GOVT.OF NCT DELHI) असे नमुद केले आहे. तसेच National Human Rights & Social Justice Commission A National Level Civic & Autonomous Body Head Quarter New Delhi, The Social Justice for Every Human अशा हेडचे लेटर हेड आणि मिरा-भाईंदर पसिरातील शिधावाटप कार्यायल क्र. ४१ फ उप-भाईंदर विभागातील अधिकृत शिधावाटप दुकानांच्या नावांची यादी पोलिसांना तपासा दरम्यान मिळुन आलेली आहे. आरोपी यांनी मिरारोड व भाईंदर पोलीस ठाणे हद्दितील रेशनिंग दुकानदार यांना धमकाविल्याचे नवघर पोलिसांना प्राथमीक तपासात आढळून आले आहे. सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/प्रकाश मासाळ(गुन्हे) पोउनि/भगवान पाटील यांनी केलेली आहे.

## चेंबूर पोलिसांची दमदार

करून खारघर याठिकाणी सापळा रचून आरोपीस शिताफीने पकडण्यात आले . आरोपीकडे गुन्हयाबाबत कसुन विचारणा केली असता आरोपीने गुन्हयाची कबुली दिली सदर आरोपीस पुढील कायदेशीर कार्यवाही करीता वैदयकीय तपासणी करुन वाशी रेल्वे पोलीस ठाणे मुंबई यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री मिलिंद भारंबे सो, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे),श्री विरेश प्रभु सो,मा.पोलीस उपायुक्त ,श्री निलोत्पल सो व मा.सपोआ डी पुर्व नितीन अलकनुरे सो, कक्ष ६ चे प्रभारी पोलीस निरीक्षक रविंद्र साळुखे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ननावरे,पोउनि मुठे ,सफौ सावंत/,पोना तुपे/ व पोशि चालक |केदार यांचे पथकाने पार पाडली आहे.

## संपादकीय...



# वाढते ध्वनिप्रदूषण हानिकारक...

वायु प्रदूषणाप्रमाणेच ध्वनी प्रदूषणाची समस्याही दिवसेंदिवस गंभीर हात चालली आहे. नोकरी, शिक्षण वा उद्योगानिमित्त ग्रामीण भागातील लोंढे शहरात येत असून, वाढत्या शहरीकरणातून विविध समस्या निर्माण होत आहेतच; परंतु यामुळे वाहतुकीवर ताण पडून वाहनांच्या कर्णकर्कश हॉर्नमुळे ध्वनिप्रदूषणातही भर पडून जात आहे, ज्याकडे अभावानेच लक्ष दिले जाते. ध्वनिप्रदूषणाला कारक ठरणाऱ्या अन्य बाबींमुळे ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली असून, ती आरोग्यास अपायकारकही ठरू पाहत असल्यामुळे याबाबत कठोर भूमिका व निर्णयांची गरज आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या ध्वनिप्रदूषणाच्या निरीक्षणानुसार राज्यातील चार प्रमुख शहरांमध्ये दिवसाच नव्हे तर रात्रीच्या नीरव वातावरणातही ध्वनी मर्यादा ओलांडली गेल्याचे निष्कर्ष समोर आले आहेत. मुंबई, सोलापूर, नाशिक व अमरावती या चारही शहरांमध्ये दिवसा आणि रात्रीही ध्वनिप्रदूषण मोठ्या प्रमाणात होत असल्याचे या निरीक्षणात आढळून आले. कोल्हापूर, मुंबई, वसई-विरार, पुणे, कल्याण, सांगली आदी ठिकाणी दिवसा, तर ठाणे, भिवंडी, मुंबई, नागपूर, चंद्रपूर, नाशिक, मालेगाव आदी ठिकाणी रात्रीचे ध्वनिप्रदूषण अधिक असल्याचे या निरीक्षणात नोंदविले गेले. या निरीक्षणाकडे गंभीरपणे बघायला हवे, कारण सदरचे प्रदूषण अनारोग्याला निमंत्रण देणारे आहे. प्रदूषणातील जल व वायू प्रदूषणाबाबत जशी जागरूकता येताना दिसत आहे, तशी ध्वनीबाबत आढळत नाही; त्यामुळे गरज नसतानाही वाहन हाकताना हॉर्न वाजवत प्रवास केला जातो. अलीकडेच दिवाळी सरली, या दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके फोडण्यात आले, त्यातून वायू व ध्वनिप्रदूषणही घडून आले. दिल्लीत तर फटाक्यांवर पूर्ण बंदी असताना आवाजाचे बार उडाले आज वायु प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा व महाविद्यालये बंद ठेवण्याची वेळ ओढविली आहे आपला क्षणिक आनंद हा वेगळ्या संकटाला निमंत्रण देऊन जातो याबाबतचे भानच बाळगले जात नाही, हा यातील चिंतनाचा व चिंतेचाही मुद्दा आहे. दोन व्यक्तींच्या बोलण्यातील असो, की वाहनांच्या हॉर्नची अगर फटाक्यांची; ध्वनीची कमाल अगर सुरक्षित प्रमाण मर्यादा ठरवून देण्यात आलेली आहे; परंतु त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने ध्वनिप्रदूषण होत असते. आपले कान ३० ते ४० डेसिबल आवाज सहन करू शकतात, मात्र वाहनांचे हॉर्न असोत की फटाक्यांचे; शंभर ते दीडशे डेसिबलपर्यंत ध्वनितरंग उठतात. कानातील नाजूक पडदे फाटून बहिरेपण येण्याची व मनस्वास्थ्य बिघडण्याची शक्यता यातून बळावते. यात सर्वाधिक ध्वनिप्रदूषणाला रस्त्यावर वाढलेली वाहनांची गर्दी व होणारे हॉर्नचे आवाज कारणीभूत ठरत असल्याचेही आढळून येते. सिग्नल मिळाला असताना एखादे वाहन नादुरुस्त असल्यामुळे रस्त्यातच अडकून पडल्यावर मागील वाहनांकडून ज्यापद्धतीने हॉर्न वाजविले जातात किंवा महामार्गावर ट्रॅफिक खोळंबल्यावर एकामागोमाग एक वाहनांचे जे हॉर्न वाजू लागतात ते ध्वनिप्रदूषणाला निमंत्रण देतात; पण याबाबत कोणीच काळजी घेताना दिसत नाही. असले प्रकार टाळण्यासाठीच 'लोकमत' माध्यमसमूहाने मागे 'हॉर्न बजाने की बिमारी' (HBKB) नावाने एक मोहीम हाती घेतली होती, त्याचा जनमानसावर चांगला प्रभावही दिसून आला होता. अन्य सामाजिक संस्थाही यासाठी पुढे आल्या व याबाबत काळजी घेतली गेली तर अनावश्यक गोंगाट टळून ध्वनिप्रदूषणाला आळा घालता येऊ शकेल. महत्त्वाचे म्हणजे असल्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी काही मानके निश्चित केली असून, त्याचे उल्लंघन करणाऱ्यांसाठी दंडाची तरतूदही आहे; परंतु संबंधित यंत्रणांकडून त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसते. प्रत्येकच शहरात घाबरवून सोडणारे हॉर्न वाजतात, परंतु अशांवर गुन्हे नोंदविले गेल्याचे अपवादानेच आढळते. शाळा व रुग्णालयांच्या परिसरात आवाज बंदीचे फलक लटकलेले असतात, परंतु तेथेही बेधडकपणे हॉर्न वाजतात. लहान मुलांना, ज्येष्ठ नागरिक व रुग्णांना त्याचा त्रास होऊनही कुणी तक्रार करीत नाही म्हणून यंत्रणा स्वतःहून काही करत नाही. खासगी व्यक्तिगत कार्यक्रमानिमित्तही गल्लीत डीजेचा दणदणाट केला जातो. याबाबतही कोणी कसले भान बाळगताना दिसत नाही. आवाजाच्या या कमाल मर्यादा गाठण्यामुळे विविध आजारांना निमंत्रण मिळून जात असल्याचे पाहता, वाढते ध्वनिप्रदूषण रोखण्याबाबत लक्ष दिले जाणे गरजेचे बनले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निरीक्षणाच्या नोंदीने त्यासंबंधीची निकड अधोरेखित होऊन गेली आहे.

# बुडबुडे आवडती सर्वांना!

राष्ट्रगीतातील 'भारत भाग्यविधाता' हे शब्द ऐकून 'पेटीएम'चे संस्थापक विजय शेखर शर्मा यांच्या डोळ्यांत पाणी आले. तसे होणे साहजिकच. प्रसंग होता त्यांच्या 'वन ९७ कम्युनिकेशन्स' या कंपनीच्या समभागांच्या भांडवली बाजारातील 'लिस्टिंग'चा. त्याआधी या कंपनीच्या 'सर्वात मोठय़ा आयपीओ'स सर्वसामान्य ग्राहक, विविध संस्थात्मक गुंतवणूकदार आदींचा उदंड प्रतिसाद लाभला. या 'आयपीओ'तून १८,३०० कोटी रुपये इतके प्रचंड भांडवल उभा करण्याचा कंपनीचा मानस यामुळे अपेक्षेपेक्षा अधिक यशस्वी झाला. शर्मा यांना देशातील सर्वात मोठा आयपीओ आणण्याचा मान हवा होता. तो त्यांना मिळाला. त्यासाठी या कंपनीच्या अवघ्या १ रुपयाच्या समभागाचे मूल्य २१५० रुपये इतके असल्याचे मूल्यांकन कंपन्यांकडून निश्चित केले गेले. त्याबरोबरीने ही कंपनी देशातील डिजिटल व्यवहारांचे कशी आधारस्थान आहे, तिची कशी भरभराट सुरू आहे असे 'या सम हा' अशा पद्धतीचे चित्रण ग्राहकांसमोर केले गेले. 'ओरडणाऱ्याची बोरे विकली जातात, पण मुखदुर्बळांचे आंबेही पडून राहतात' या आपल्याकडील संस्कृतीप्रमाणे 'पेटीएम'बाबत अनेकांचा सामुदायिक ओरडा झाल्याने या कंपनीच्या समभागात हां हां म्हणता लाखोंनी लाखो रुपयांची गुंतवणूक केली. त्यानंतर गेल्या आठवडय़ात या समभागांचे समारंभपूर्वक लिस्टिंग झाले. अलीकडे सर्व व्यवहारांत राष्ट्रभावना चेतवण्याच्या नव्याच सवयीप्रमाणे या प्रसंगी राष्ट्रगीत गायन झाले. तेव्हा राष्ट्रगीतातील 'भारत भाग्यविधाता' हे ऐकून शर्मा भावनाविवश होऊन त्यांस रडू आले. त्यानंतर या समभागांच्या घसरणीने गुंतवणूकदारांच्या डोळ्यांतूनही अशाच अश्रुधारा वाहिल्या असणार.

शर्मा यांचा अश्रुपात साहजिक अशासाठी की हे भारतातच घडू शकते. जी कंपनी तोटय़ात आहे, ज्या कंपनीच्या 'उत्पादन'मार्गाची आणि त्याद्वारे नफा आदी भविष्यातील उत्पन्नाची निश्चित शाश्वती नाही त्या कंपनीचा अवघा १ रुपयाचा समभाग तब्बल १९०० पट अधिक रकमेने विकला जातो आणि या मूल्यांकनाबाबत कोणासही काही वाटत नाही. या कंपनीच्या ज्या १ रुपयाच्या समभागासाठी गुंतवणूकदारांनी, यात बडय़ा वित्तसंस्थाही आल्या, प्रतिसमभाग २१५० रुपये मोजले तो समभाग त्या दिवशी तब्बल २७ टक्क्यांनी गडगडला. म्हणजे जे घेण्यासाठी २१५० रुपये मोजले त्याची किंमत त्या दिवशी १५६४ रुपये इतकीच झाली. ही घसरण इतकी मोठी होती की काही काळ त्यातील व्यवहार थांबवले (सर्किट ब्रेकर- जे किमतीत १० टक्के घसरण झाल्यास लागते) गेले.

'भांडवली बाजारात हे असे होते', असे स्पष्टीकरण यावर दिले जाईल, ते मान्यच. पण मुद्दा भांडवली बाजारात काय होते हा अजिबातच नाही. तर या बाजारात येण्याआधी समभाग काढणाऱ्या कंपनीच्या मूल्यांकनाबाबत आपल्याकडे काय होते (की होत नाही) हा आहे. याआधीही प्रत्यक्षात 'त्या वेळी' एक दमडीचेही उत्पन्न नसलेल्या 'रिलायन्स पॉवर' नामे कंपनीचीही अशीच विक्रीपूर्व हवा निर्माण केली गेली आणि बाजाराची फारशी काही समज नसलेल्या नागरिकांनी झुंडीने त्यात पैसे ओतले. पहिल्याच दिवशी हा समभाग दणकून आपटला आणि २८१ रुपयांच्या या समभागाची किंमत आज जेमतेम १४-१५ रु. असेल/नसेल. या समभागाचे मूळ किमतीच्या सुमारे ९५ टक्के इतके प्रचंड अवमूल्यन झालेले आहे. असाच मोठा गवगवा झाला तो 'नायका'च्या समभागांबाबत. त्याचे मोठे धडाक्यात 'लिस्टिंग' झाले. पण नंतर या कंपनीचा 'सुधारित ताळेबंद' जाहीर होऊन कंपनीच्या तोटय़ाचे चित्र समोर आल्यावर गुंतवणूकदार गडबडले. या कंपनीच्या नफ्यात तिमाहीत तब्बल ९६ टक्क्यांची घट झाल्याचे यात समोर आले. समभागांचे 'लिस्टिंग' झाल्यानंतर कंपनीच्या बँकर्सकडून सुधारित ताळेबंद जाहीर होणे हा केवळ योगायोग समजावा की अन्य काही हे समजून घेण्यास शहाणे समर्थ आहेत. या कंपनीच्या समभागांचे मूल्य आणि कंपनीचे मूल्यांकन याबाबतही अनेक अभ्यासकांनी शंका उपस्थित केल्या होत्या. त्याआधी 'झोमॅटो'चेही तेच. आज या कंपनीचा समभाग भले दराने कमी झाला नसेल पण अवाढव्य तोटा असताना हा सर्व डोलारा किती काळ असाच टिकणार हा प्रश्न उरतोच. यानिमित्ताने हे नवनवे कॅपिटलिस्ट्स), या समभागांचे बँकर्स आणि अर्थातच या नवउद्योगांचे प्रवर्तक यांच्या एकमेकांतील हितसंबंधावर नजर ठेवून त्यांचे रास्त मूल्यांकन होते की नाही हे पाहण्याची जबाबदारी भांडवली बाजाराची नियंत्रक असलेल्या 'सेबी' या यंत्रणेची. सांस्कृतिक, साहित्यिक वर्तुळात ज्याप्रमाणे एकमेकांत 'तू महान, मी महान' हा खेळ सुरू असतो त्याप्रमाणे अर्थविश्वातही घडत असते. दोहोंतील फरक इतकाच की अर्थविश्वात सामान्य गुंतवणूकदारांचा पैसा असतो. पण त्यातील खऱ्याखोटय़ाने होणारे नुकसान मात्र खरे असते. म्हणून अवाचे सवा मूल्यांकनाचा परिणाम लक्षात घ्यायला हवा. तो असा की त्यामुळे अशा जोखमीच्या उद्योगातील गुंतवणूक सोडवून घेण्याची संधी




नवउद्योग (स्टार्टअप) म्हणजे जणू भारतीय गुंतवणूकदारांचे अर्थोद्धारकर्ते हे जे चित्र निर्माण झाले आहे त्याबाबत विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. 'लोकसत्ता' या नवउद्यमींचे मोल जाणत नाही वा त्यांच्या विरोधात आहे असे अजिबात नाही. पण त्यांच्या रिकाम्या ताळेबंदाचा फुगा ज्या पद्धतीने फुगवला जातो त्याबाबत जागरूकता निर्माण करणे हे मात्र 'लोकसत्ता' आपले निश्चित कर्तव्य समजतो. याचे कारण असे की या नवउद्यमींतील गुंतवणूकदारांस, ती उभी राहावीत म्हणून भांडवल पुरवणाऱ्यांस आपली गुंतवणूक कशी सत्पात्री आहे हे सांगण्यात रस असतो. ते साहजिकच. त्यामुळे हे जोखीम भांडवलदार (व्हेंचर मूळ भांडवलदारांस मिळते. त्याच्या गुंतवणुकीचे दामदुप्पट होते. पण त्यास भुलून त्यात आपला घामाचा पैसा गुंतवणाऱ्या सामान्य माणसाचे मात्र लाखाचे फक्त बारा होऊन तो भिकेस लागतो. म्हणजेच या उद्योगांचा तोटा सामान्य गुंतवणूकदारांत विभागला जातो (डिस्ट्रिब्युटिंग लॉसेस) आणि प्रवर्तक, भांडवलदार आपल्या गुंतवणुकीवर नफा कमावतात.

जे झाले त्यावरून या कंपन्यांचे दीर्घकालीन मूल्यमापन केले जाऊ नये, असा एक युक्तिवाद यावर होतो. 'पेटीएम'च्या शर्मा यांचे प्रतिपादनही त्याच धर्तीचे. पण दीर्घकालीन म्हणजे किती? आणि दीर्घकालीन फायदे हवे असतील तर सुरक्षित, सरकारी आदी गुंतवणूक योजना काय वाईट? भांडवली बाजारात सामान्य गुंतवणूकदार येतो तो अल्पकाळात अधिक परतावा मिळावा यासाठी. 'आज'च्या गरजेचा विचार करून गुंतवणूक करणाऱ्यास 'उद्याची' वाट पाहा हे सांगण्यात काय शहाणपण? तेव्हा या कंपन्यांनी नफा जरूर कमवावा. तेच उद्योगाचे ध्येय असायला हवे. पण यात काही एक प्रामाणिकपणा असणे गरजेचे आहे. हा प्रामाणिकपणा निरोगी भांडवलशाहीचा कणा असतो. तो ताठ राहील हे पाहण्याची जबाबदारी 'सेबी'सारख्या यंत्रणेची. त्या यंत्रणेवर दबाव असायला हवा तो जागरूक, अर्थ आणि बाजारसाक्षर गुंतवणूकदारांचा. खरी मेख आहे ती येथेच. या सामाजिक विवेकाची बोंब हेच तर आपले खरे दुखणे. त्यामुळे जन्माला आल्या आल्या 'सत्यम'सारख्या कंपन्यांचे बाजारमूल्य (मार्केट कॅप) अनेक बडय़ा बडय़ा कंपन्यांपेक्षा किती तरी पट अधिक असल्याची हवा निर्माण केली जाते आणि तरीही त्यावर 'ब्र'ही कोणी काढत नाही. या प्रसंगी नंतर 'सत्यम'चे काय झाले याचे स्मरण करून देण्याची गरज नाही आणि या नव्या नवउद्यमींची, त्यांच्या उद्योगांची तुलना 'सत्यम' वा तिचा प्रवर्तक रामलिंगम राजू याच्याशी करण्याचा हेतू नाही. 'लोकसत्ता'चा प्रयत्न आहे तो बाजारसाक्षरतेचा.

गुंतवणूकदारांनी डोळे उघडे ठेवून आणि डोके जागते ठेवून आपला पैसा गुंतवावा. कारण सरकारी यंत्रणांच्या भरवशावर राहिले की काय होते याचे दाखले द्यावेत तितके कमीच. अनेक बुडबुडे आतापर्यंत आले. त्यात अनेकांचे हात पोळले. राजकीय असो वा सामाजिक वा आर्थिक. 'बुडबुडे आवडती सर्वांना' हेच आपले वास्तव. अन्य क्षेत्रांचे ठीक. पण आपल्या नेकीच्या गुंतवणुकीवर नेक नफा हवा असेल तर या क्षेत्रातील बुडबुडे निर्मितीआधीच रोखायला हवेत.

# मिरा भाईंदर महानगरपालिकेने सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज अंतर्गत देशस्तरावर रोवला झेंडा...!

***३-१० लाख लोकसंख्येच्या गटामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका राष्ट्रीय स्तरावर देशात आठव्या आणि महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमांकाने मानांकित***



मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त दिलीप ढोले यांचे राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कार्य हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन अधिनियम, २०१३ च्या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व नागरी कार्य मंत्रालयाने देशातील सर्व शहरांमध्ये १९ नोव्हेंबर २०२० ला "सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज" अभियान सुरु केले आहे. भुयारी गटारी, मलनिःसारण वाहिनी मध्ये कार्यरत सफाईमित्र यांच्याद्वारे करण्यात येणाऱ्या मानविकृत साफसफाईला प्रतिबंध करण्यासह जास्तीत जास्त यांत्रिकीकृत साफसफाईला प्राध्यान्य देण्याचा या अभियानाचा उद्देश आहे. देशस्तरावर आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत विविध कार्यक्रम सुरु असून त्याच अंतर्गत आज दिल्लीच्या विज्ञान भवन मध्ये स्वच्छ अमृत महोत्सव कार्यक्रम संपन्न झाला. महामहिम राष्ट्रपती श्री रामनाथ कोविंद, शहरी विकास मंत्री श्री हरदीप सिंह पुरी यांच्या हस्ते सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज अभियानाचा निकाल आज जाहीर करण्यात आला. मिरा भाईंदर महानगरपालिका द्वारा विविध नाविन्यपूर्ण संकल्पना या अभियानामध्ये राबवत आपलं स्थान आणि योगदान सतत दिलं.

३-१० लाख लोकसंख्येच्या गटामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेला राष्ट्रीय स्तरावर देशात ८ वा व महाराष्ट्रात दुसरा मानांकित करण्यात आलं. मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज ची महानगरपालिकेची टीम सतत सक्रिय राहिल्याने हे यश संपादन केलं.

आयुक्त दिलीप ढोले यांच्या द्वारे सतत या अभियानामध्ये विविध संकल्पना राबविण्यात आल्या ज्यामुळे एक वेगळं स्थान कार्यपद्धती या अभियानामध्ये दिसून आली. महानगरपालिकेद्वारे सुरु करण्यात आलेल्या सफाईमित्र उद्यमीकरण आणि उन्नतीकरण प्रोत्साहन योजना द्वारे अधिकृत सफाईमित्रांना युनिफॉर्म वाटप असेल,

सुरक्षा साधने असेल त्यासोबतच सीएसआर द्वारे जवळपास ४०० सफाई कामगारांना फूड किट चे वाटप करण्यात आले ज्या कारणाने पाणी पुरवठा विभागाद्वारे एक सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्रामद्वारे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना इंटर्नशिप देऊन युवकांचा या अभियानामध्ये सक्रिय सहभाग करून या अभियानाचा मुख्य उद्देश्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यास मदत झाली. अभियानाचा एक भाग म्हणून शिक्षण विभागाचे सहकार्य घेत "सफाईमित्र चित्रकला सप्ताह" आयोजित करून त्याअंतर्गत चित्रकला आणि निबंध स्पर्धा आयोजित करून शालेय विद्यार्थ्यांचा या अभियानामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला जेणेकरून त्यांच्याद्वारे या अभियानाचा उद्देश्य घरोघरी पोहचण्यास मदत झाली.

लॉकडाऊन आणि कोरोना परिस्थती असताना देखील पाणी पुरवठा विभागाद्वारे "सफाईमित्र ऑनलाइन टॉल्क सिरीज" सुरु करण्यात आली ज्याद्वारे नागरिकांना, शिक्षकांना आणि महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना या अभियानामध्ये सक्रियता ठेवण्यास प्रोत्साहन देण्यात आले. एकदिवसीय "सफाईमित्र सुरक्षा संमेलन" आयोजित करून या अभियानातील सर्व घटकांना एकत्रित एका डिजिटल प्लॅटफॉर्म वर आणून विविध प्रकारे प्रात्यक्षिके दाखवून जनजागृती करण्यात आली. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे राष्ट्रीय स्तरावर झालेलं कौतुक निश्चितच शहराचं एक वेगळं स्थान निर्माण करणार आहे तसेच आयुक्त दिलीप ढोले यांच्या द्वारे केले जाणारे विविध नाविन्यपूर्ण प्रकल्प हे या अभियानामध्ये यशाच्या स्वरूपाने फलित झालेली दिसून येत आहे.

## मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

तळ मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

जा.क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/ ५७४ /२०२१-२२ दिनांक : १८/११/२०२१

### // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाड काढणे / पुर्न:रोपण करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वृक्षाचे नाव | उंची | संख्या | |
|---|---|---|---|---|
| १. | ख्रिसमस ट्री | २० ते २२ फुट उंच | ०१ | सदरचे झाड लक्ष्मी पॅलेस, रो हाऊस नं.०१ येथे असुन झाडाची मुळे कंपाऊंड भिंतीत गेलेली असून सदर झाडामुळे कंपाऊंड भित पडुन जिवीत व वित्तहानी होण्याची शक्याता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. **Mr. Jacob John यांचे दि. २४/०८/२०२१ रोजीचे पत्र.** |
| २. | नारळ | २० ते २५ फुट उंच | ०१ | सदरचे झाड मिरारोड (पु.) पुनम सागर कॉम्पलेक्स येथे असुन झाडाची मुळे शेजारी असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीत गेली असुन त्यामुळे पाणी दुषित होत असुन सदरचे झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. **पुनम सागर कॉम्पलेक्स को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि. १४/१०/२०२१ रोजीचे पत्र.** |
| | | एकुण | ०२ | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याचो /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (वृक्ष प्राधिकरण), उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**जागरूक नागरिक मी भारताचा**
**हक्क बजावीन मतदानाचा**

**जा.क्र मनपा/जनसंपर्क/ ३७१/ २०२१-२२**
**दिनांक १८/११/२०२१**

**सही/-**
**कंचन गायकवाड**
**सहाय्यक आयुक्त तथा**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

## अमेरिकन नागरिकांना फसवणाऱ्या बोगस ॲमेझॉन कॉल सेंटरचा पर्दाफाश, नवी मुंबईत 7 जणांना बेड्या



नवी मुंबईः ॲमेझॉनचे बोगस कॉलसेंटर चालवून त्यातून अमेरिकन नागरिकांना फसवणाऱ्या लोकांची बनवेगिरी नवी मुंबई पोलिसांनी उघडी पाडली आहे. या बोगस कॉल सेंटरचा आज (22 नोव्हेंबर) पोलिसांनी पर्दाफाश केला असून या गुन्ह्याखाली 7 जणांना अटक केली आहे. त्यांच्याकडून 10 लॅपटॉपसह इतर सायबर गुन्हेगारीसाठीचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. अकाउंट हॅक झाल्याचे सांगत होते चोर पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार, ऐरोली सेक्टर 20 मधील शिवशंकर हाईट इमारतीत ॲमेझॉन नावाने हे लोक बोगस कॉल सेंटर चालवत होते. या कॉल सेंटरमधून अमेरिकन नागरिकांना फोन केले जात होते. तुमचे अकाउंट हॅक झाल्याचे सांगून ते परत चालू करायचे असेल तर आपल्याला काही रक्कम भरावी लागेल, ती आपल्याला चेकद्वारे परत दिली जाईल, असे आश्वासन दिले जात होते. खातेधारकांनी दिलेली रक्कम हे लोक आपल्या अकाउंटवर वळवून घेत असत. अशा प्रकारे या लोकांना अनेक अमेरिकन नागरिकांना फसवल्याचे चौकशीत मान्य केले आहे. ॲमेझॉनचा कॉल डेटा चोरून रचला सायबर चोरीचा कट विशेष म्हणजे असा प्रकारे चोरी करण्यासाठी या लोकांनी ॲमेझॉनचा कॉल डेटा हॅक केल्याचे सांगितले आहे. या कारवाईत सात आरोपींना जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले आहे. या आरोपींकडून 10 लॅपटॉप, 2 राऊटर, 8 मोबाइल, 4 हेडफोन आणि मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान आरोपींना 23 नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## पोलिस पुत्राचा खून वर्चस्वाच्या वादातून; 3 मारेकऱ्यांना ठोकल्या बेड्या




नाशिक : नाशिकच्या पंचवटी परिसरात झालेल्या पोलीस पुत्राच्या खुनातील 3 मारेकऱ्यांना म्हसरुळ पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. वर्चस्वाच्या वादातून हा खून झाल्याचे प्राथमिक पोलीस तपासात समोर आले आहे. मृत प्रवीण काकड याची ही गुन्हेगारी पार्श्वभूमी होती. त्या वादातूनच हा खून झाल्याचे समजते. मद्यपान करताना वार काही दिवसांपूर्वी जामिनावरुन तुरुंगाबाहेर आलेल्या आरोपीचा अज्ञात व्यक्तींनी निर्घृण खून केल्याची घटना पंचवटी परिसरात म्हसरुळ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील आडगाव लिंक रोडवर घडली होती. पोलिसांना रोहिणी हॉटेलच्या जवळ एका तरुणाचा मृतदेह आढळून आला होता. हा मृतदेह एका निवृत्त पोलीस कर्मचाऱ्याच्या मुलाचा असल्याचे समजताच एकच खळबळ उडाली होती. प्रवीण काकड हा तरुण मित्रांसोबत रोहिणी हॉटेलजवळ मद्यपान करत बसला होता. त्याचवेळी काही अज्ञात व्यक्तींनी तेथे येऊन धारदार हत्याराने प्रवीणवर वार केले. या हल्ल्यात प्रवीणचा जागीच मृत्यू झाला होता. गुन्हेगारी पार्श्वभूमी प्रवीण एका सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्याचा मुलगा असून, त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी होती. काही दिवसांपूर्वीच तो जामिनावर सुटून बाहेर आला होता.

## एटीएममध्ये बिनधास्त धुसला अन् मशीन फोडू लागला, सायरन वाजता पळाला, औरंगाबादमध्ये एकजण ताब्यात



औरंगाबादः कोणत्याही एटीएममध्ये किंवा इतर ठिकाणी चोरी करणारे चोरटे नेहमी तोंडाला मास्क लावून किंवा संपूर्ण चेहरा झाकूनच चोरी करतात. मात्र बोरगाव बाजार येथील चोराने चेहरा न झाकताच थेट बोरगाव बाजार येथील सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे एटीएम फोडण्याचा प्रयत्न केला. मात्र काही वेळातच सायरन वाजल्याने तो पळून गेला. सीसीटीव्हीत त्याचा स्पष्ट चेहरा दिसल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने 24 तासाच्या आता त्याला गजाआड केले. सिल्लोडमधील बोरगाव बाजार येथील घटना

या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अफसर गुलाब शहा असे आरोपीचे नाव असून तो नातेवाईकांचा आसरा घेऊन बोरगाव बाजार येथे राहत आहे. त्याच्या राहण्याच्या ठिकाणाहून अवघ्या 20 किमी अंतरावरच त्याने चोरीचा प्रयत्न केला. त्यामुळे त्याला ओळखणाऱ्यांची संख्या त्या भागात अधिक निघाली.

# सोशल मीडियावर फ्रेंडशीप, मोबाईल नंबर मागितला, मग थेट न्यूड कॉल, सेवानिवृत्त मुख्याध्यापकाला ब्लॅकमेलिंगचा प्रयत्न

मुंबई : दक्षिण मुंबईतील एका शाळेतील निवृत्त मुख्याध्यापकाला एका महिलेने न्यूड व्हिडिओ कॉल केल्याची घटना समोर आली आहे. व्हिडिओ कॉल करून त्याचे रेकॉर्डिंग करून नंतर ब्लॅकमेलिंगचा प्रयत्न करण्यात आला. पैशांची मागणी करण्यात आली. आरोपी महिलेने रेकॉर्ड केलेला व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. तसेच बलात्काराचा गुन्हा दाखल करेन अशी धमकी देण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, ही महिला ऑनलाइन माध्यमातून सेवानिवृत्त मुख्याध्यापकावर लक्ष ठेवून होती. सोशल मीडियावर तिने आधी फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून फोन नंबर मागितला. फोन नंबर मिळाल्यानंतर तिने अचानक नग्न होऊन व्हिडिओ कॉल केला. फोन रिसिव्ह केल्यावर रेकॉर्ड केला आणि नंतर पैशांची मागणी करू लागली. पैसे न दिल्यास व्हिडिओ व्हायरल करण्याची आणि बलात्कार प्रकरणात गोवण्याची धमकी दिली. मुंबईच्या खार पश्चिम भागात राहणाऱ्या सेवानिवृत्त मुख्याध्यापकाने या घटनेनंतर 17 नोव्हेंबरला तक्रार दाखल केली.

### मुख्याध्यापक सेक्सटोर्शनच्या जाळ्यात अडकले!

2002 मध्ये निवृत्त झालेल्या मुख्याध्यापकाने खार पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. निवृत्तीनंतरही ते सोशल मीडियाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी जोडले गेले आहेत. कलेशी संबंधित अनेक गोष्टी ते सोशल मीडियावर अपलोड करत असतात. 10 नोव्हेंबरला एका महिलेने त्यांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली. तिने सांगितले की ती ब्युटी पार्लरमध्ये काम करते. महिलेने मुख्याध्यापकांशी बोलण्याची इच्छा व्यक्त केली. 'मला तुमच्याशी काहीतरी बोलायचे आहे' असा मॅसेज तिने पाठवला.



### आधी फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली, नंतर नंबर पाठवला आणि न्यूड व्हिडिओ कॉल केला

आधी या महिलेशी मुख्याध्यापकाची कोणतीच ओळख नव्हती. त्यामुळे मुख्याध्यापकांनी तिची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारली नाही. यानंतर महिलेने तिचा फोन नंबर सोशल मीडियावर शेअर केला आणि तिला तातडीने बोलायचे आहे, असा मेसेज केला. प्रिन्सिपलच्या म्हणण्यानुसार काहीतरी महत्त्वाचे काम असेल त्यांना वाटले. त्यामुळे त्यांनी त्यांचा नंबरही शेअर केला. दुसऱ्या दिवशी संबंधित महिलेने मेसेज केला. मात्र मुख्याध्यापकांनी त्या संदेशाला प्रतिसाद दिला नाही. यानंतर तिने 12 नोव्हेंबरला थेट व्हिडिओ कॉल केला. त्यावेळी ती नग्न अवस्थेत होती. प्राचार्यांनी लगेच कॉल कट केला.

या घटनेनंतर दोन दिवसांनी आरोपी महिलेचे फोन येऊ लागले. आरोपी महिलेने धमकावत व्हिडिओ कॉल रेकॉर्ड केल्याचे सांगितले. यानंतर ती ब्लॅकमेल करु लागली. संबंधित महिलेने तिच्यावर बलात्काराचा आरोप करून व्हिडिओ रेकॉर्डिंग पत्नी आणि मुलाला पाठवण्याची धमकी दिली. यानंतर मुख्याध्यापकांनी पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली.

## सचिन वाझे याची चांदीवाल आयोगासमोर सुनावणी, उलट तपासणी होणार



मुंबई : बडतर्फ पोलीस अधिकारी एपीआय सचिन वाझे याची न्या. चांदीवाल आयोगात आज साक्ष पार पडली. यावेळी आपले प्रतिज्ञापत्र हेच साक्ष समजावी. त्याचप्रमाणे आयोगाच्या कामकाजावर आपला विश्वास असल्याचंही सचिन वाझे याने आयोगाला सांगितलं. तर परमबीर सिंग याने काही कागदपत्रे खोटी सादर केली आहेत. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी अनिल देशमुख यांच्या वकिलांनी केली.

### उलट तपासणी होणार

न्या चांदीवाल आयोगासमोर आज बडतर्फ एपीआय सचिन वाझे याला साक्षीसाठी 12 वाजता सचिन वाझे आयोगा समोर आणण्यात आलं. यावेळी त्याला काही बोलायचं आहे का? काही अर्ज द्यायचा आहे का? असं न्या चांदीवाल यांनी विचारलं. यावेळी 25 जून आणि 15 जुलै 2021रोजी आपण प्रतिज्ञापत्र सादर केली आहेत. त्याचप्रमाणे 29 जुलै 21 रोजी एक अर्ज केला आहे. माझे दोन प्रतिज्ञापत्र हेच माझे जबाब समजावेत आणि 29 जुलै रोजी आपण जो अर्ज सादर केला आहे तो काय ते समजण्यात यावा. आपला या आयोगाच्या कामकाजावर विश्वास आहे. आपण या प्रकरणातील छोटा प्यादा आहोत, असं वाझेने सांगितलं. कोर्टाने त्याचं म्हणणं मान्य करून त्याची उलट तपासणी इतर पक्षाला करायची असल्यास त्याबाबत उद्या दुपारी 2 वाजता सुनावणी ठेवण्यात आली आहे.

### परमबीर सिंग यांचा आयोगाच्या कामकाजाला विरोध

माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी आयोगाच्या कामकाजाला विरोध केला आहे. आयोग बेकायदेशीर असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

मात्र ,याबाबत त्यांच्या बाजूने कोणताही आदेश न दिल्याने परमबीर सिग यांना कोर्टाच्या कामकाजाला समोर जावं लागत आहे. याबाबत त्यांनी आपला पॉवर ऑफ अटर्नी कोर्टाला सादर केला आहे. तर त्यांनी वेळेत प्रतिज्ञापत्र सादर न केल्याने त्यांना आयोगाने दंड ठोठावला आहे. दंडाची रक्कम ही त्यांनी चेकने आयोगाला भरली आहे. मात्र, आयोगाकडे परमबीर यांनी सादर केलेली कागदपत्र यावरील सही आणि चेक यावरील सही ही वेगळी आहे. यावरून परमबीर सिंग यांनी सादर केलेली कागदपत्रे खोटी असल्याचा संशय आहे, असा मुद्दा अनिल देशमुख यांच्या वकिलाने उपस्थित केला.

परमबीर सिंग यांनी स्वतः हजर न राहता महेश पांचाळ नावाच्या व्यक्तीला मुखत्यारपत्र देऊन आयोगासमोर सादर केलं आहे. प्रत्यक्षात पांचाळ यांना याबाबतची काही माहिती आहे. त्यांची कायदेशीर वैधता तपासण्यासाठी त्यांना आयोगा समोर बोलवावं, अशी मागणी संजीव पालांडे यांचे वकील शेखर जगताप यांनी आयोगाकडे केली. न्या. चांदीवाल आयोगात उद्या सचिन वाझे याची महत्वाची अशी उलट तपासणी होणार आहे. यावेळी 100 कोटींच्या वसुली प्रकरणात आता त्याची भूमिका काय आहे हे स्पष्ट होणार आहे.

## खिडकीतून बेडरूममध्ये डोकावणे रिक्षा चालकाच्या बेतले जीवावर, धारदार शस्त्राने वार करुन हत्या

कल्याण : खिडकीतून लोकांच्या बेडरुममध्ये डोकाऊन पाहणे रिक्षा चालकास महागात पडले आहे. कल्याणमधील उंबर्डे गावात झालेल्या हत्या प्रकरणी खडकपाडा पोलिसांनी सोपान पंजे नावाच्या युवकाला अटक केली आहे. सोपानने रिक्षा चालक अभिमान भंडारी याची धारदार शस्त्राने हत्या केली होती. अभिमान दररोज पहाटे सोपान याच्या वहिनीच्या बेडरुमच्या खिडकीतून डोकावून पाहत असे. त्याला वारंवार समजावले होते, तरी देखील तो ऐकत नसल्याने सोपान याने अभिमान याची हत्या केल्याची कबुली दिली आहे.

तीन दिवसापूर्वी झाली होती रिक्षा चालकाची हत्या

कल्याण पश्चिमेतील उंबर्डे गावातील रहिवासी अभिमान भंडारी हे नेहमीप्रमाणे पहाटे 4 च्या सुमारास गावातील सार्वजनिक शौचालयात शौच करण्यासाठी गेले होते. यावेळी शौचालयात आधीच दबा धरुन बसलेल्या अज्ञात व्यक्तींनी त्यांच्यावर हल्ला केला. भंडारी यांच्यावर धारदार शस्त्राने सपासप वार करुन हल्लेखोर तेथून पळून गेले होते. या घटनेमुळे गावात एकच खळबळ उडाली होती.



पोलिसांनी 24 तासाच्या आत प्रकरणाचा छडा लावला

खडकपाडा पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करीत तपास सुरु केला. डीसीपी सचिन गुंजाळ, एसीपी उमेश माने पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी 24 तासांच्या आतच या प्रकरणाचा छडा लावला. या प्रकरणात पोलिसांनी सखोल तपास करीत अभियान याची हत्या करणाऱ्या तरुणाला ताब्यात घेतले. आरोपीच्या अटकेनंतर जी माहिती समोर आली ती अतिशय धक्कादायक आहे.

रिक्षा चालकाच्या विकृतीमुळे त्याचा अंत

अभिमानच्या विकृतीमुळेच त्याचा अंत झाल्याचे समोर आले आहे. अभिमान याला एक वाईत सवय होती. रात्रीच्या वेळी शेजाऱ्यांच्या बेडरुमध्ये डोकावून पाहत असे. एका रात्री सोपान पंजे याने पाहिले तो त्याच्या वहिनीच्या घरातील खिडकीतून त्यांच्या बेडरुममध्ये डोकावून पाहत आहे. दोन तीन वेळा असा प्रकार घडला. सोपानचा भाऊ एका प्रकरणात जेलमध्ये आहे. वारंवार सांगून सुद्धा अभिमान हा ऐकण्यास तयार नव्हता. अखेर त्याने तोच प्रकार केला. यामुळे सोपानला राग अनावर झाला. त्याने अभिमान याची धारदार शस्त्राने हत्या केली.

## तू माझ्यावर प्रेम नाही केलं तर ... म्हणत अल्पवयीन मुलीवर केला अत्याचार

पुणे – तेरा वर्षीय अल्पवयीन मुलीला पळवून नेत तिच्या लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. वडगाव शेरी येथील महिलेने चंदननगर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार पोलिसांनी मल्लेश विठ्ठल कांबळे (19) थिटेवस्ती , खराडी येथील तरुणावर गुन्हा दाखल करत अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी महिलेने आपली 13 वर्षांची मुलगी घरातून गेलेली परतलीच नाही. तिला फूस लावून पळवून नेल्याची तक्रार 21 नोव्हेंबर रोजी दाखल केली. तक्रारीनुसार पोलिसांनी आयपीसी कमल363 गुन्हा दाखल करत शोध घेण्यास सुरुवात केली. तपास करत असताना पोलिसांनी मुलीला फिर्यादीच्या ओळखीतील मुलाने पळवून नेल्याची माहिती मिळाली. माझे तुझ्यावर प्रेम आरोपी मल्लेशने मुलीला लग्नाचे आमिष दाखवत वडगाव शेरी परिसरातील मोकळ्या रूम नेले. तिथे गेल्यानंतर आरोपीने अल्पवयीन मुलीला माझे तुझ्यावर प्रेम आहे. तू जर माझ्यावर प्रेम नाही केले, तर मी आत्महत्या करेन अशी बतावणी तरुणाने मुलीकडे केली. त्यानंतर जबरदस्तीने तिच्यासोबत मुली सोबत लैंगिक संबंध ठेवले. याप्रकरणी पोलिसांनी पॉस्को अंतर्गत गुन्हा दाखल करत मल्लेश कांबळे याला अटक केली आहे.



22 मोबाईल हॅण्डसेटसह एक अटकेत

दुसरीकडे घराचा दरवाजा उघडा दिसताच घरात घुसून मोबाईल फोन , पैसे चोरणाऱ्या एकाला पुणे पोलिसांनी जेरबंद केल आहे. मुरली नागराज असे टाका करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे, आरोपीकडून पोलिसांनी तब्बल 22 मोबाईल हँडसेट जप्त केले आहे. शहरातील विविध भागात आरोपीने चोरी केल्याचं उघड झालं आहे. दूध, वर्तमानपत्र आणायला घरातील लोक बाहेर पडले की तत्परतेने डाव साधत घरात घुसून मोबाईलची तसेच पैश्यांची चोरी करायचा. कुणालाही कळायच्या आतमध्ये तो घरातून पसार व्हायचा. मात्र एके ठिकाणी चोरी करून बाहेरपडताना सीसीटीव्हीही कॅमेऱ्यात आला आणि तिथे अडकला. पोलिसांनी सीसीटीव्हीच्या मदतीनं चोराची ओळख पटवत त्याचा शोध घेत अटक केली.

## पंढरपूरला देवदर्शन, मग बायकोच्या माहेरी, नंतर वडिलांची भेट, अखेर पती-पत्नीचा गळफास



उल्हासनगर : उल्हासनगरात पती पत्नीनं गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. आत्महत्येचं कारण अद्याप अस्पष्ट असून या दाम्पत्याची दोन मुलं मात्र या घटनेनं पोरकी झाली आहेत. आत्महत्या करण्यापूर्वी दोघांनी पंढरपूरला देव दर्शन घेत आई वडिलांची भेट घेतली होती, अशी माहिती समोर आली आहे. काय आहे प्रकरण? उल्हासनगरच्या कॅम्प 1 भागातील राजीव गांधी नगर परिसरात सचिन आणि शर्वरी सुतार हे दाम्पत्य त्यांच्या 7 आणि 4 वर्षांच्या दोन मुलांसह वास्तव्याला होतं. आज सकाळी या जोडप्यानं घरातच गळफास घेतल्याचं त्यांच्या मुलांनी पाहिलं आणि शेजाऱ्यांना या घटनेची माहिती दिली. कार्तिकी एकादशीला पंढरपूरला सचिन सुतार हे सुतारकाम करायचे. त्यांच्यावर कोणतंही कर्ज नव्हतं, किंवा आर्थिक अडचणही नव्हती, अशी माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी दिली. आत्महत्या करण्यापूर्वी सचिन सुतार हे पत्नी आणि मुलांसह कार्तिकी एकादशीला पंढरपूरला जाऊन आले. त्यानंतर शुक्रवारी ते शर्वरी यांच्या माहेरी चिपळूणला जाऊन आले, तर शनिवारी ते सचिन यांच्या वडिलांकडे डोंबिवलीला जाऊन आले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898